**<u>मोटार अपघात अर्ज क्र. १/२०१८</u>**
**निशाण क्र. ८९**

अर्जदारतर्फे **साक्षीदार क्र. ६** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— वासुदेव　वडिलांचे नांव :— केशव महाले,
वय सुमारे:— ४० वर्षे,　व्यवसाय :— नोकरी,
निवासस्थान :— उगवे, पेडणे, गोवा.

**<u>सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. डी.ए.अंधारी यांचा.</u>**

१.　मी २०१५ सालापासून शरयू ऑटोमोबाईल्स, बार्देस गोवा येथे खजिनदार म्हणून कार्यरत आहे. आमचे प्रतिष्ठानात टोयोटा वाहनाचे दुरुस्तीचे शोरुम आहे. अर्जदार यांनी त्यांचे टोयोटा इनोव्हा वाहन क्र. एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ आमचे प्रतिष्ठानात दुरुस्तीकरीता आणले होते आणि आम्ही त्यांना वाहन दुरुस्त करुन दिले होते. सदरील वाहन दुरुस्तीच्या बिलाची रक्कम अर्जदार यांनी आम्हांला अदा केली होती. सदरील रक्कम अदा केल्याच्या सर्व पावत्या मी तयार केल्या. आता मला त्या पावत्या नि. ५३, ५४, ५५, ५७ व ५८ दाखविल्या, त्या त्याच बिलाच्या पावत्या आहेत. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर सत्य व खरा आहे.

**<u>उलटतपास सामनेवाले क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ श्रीमती एस.आर.मसुरकर यांचा.</u>**

२.　अर्जदार यांनी त्यांचे वाहन आमचे प्रतिष्ठानात दुरुस्तीकरीता कोणत्या तारखेला आणि कोणत्या वेळी आणले, हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगितले की, ‘‘आमचे प्रतिष्ठानात टोयोटा वाहनाचे दुरुस्तीचे शोरुम आहे, अर्जदार यांनी त्यांचे टोयोटा इनोव्हा वाहन क्र. एमएच—०४—डीडब्ल्यू—७३८७ आमचे प्रतिष्ठानात दुरुस्तीकरीता आणले होते आणि आम्ही त्यांना वाहन दुरुस्त करुन दिले होते, सदरील वाहन दुरुस्तीच्या बिलाची रक्कम अर्जदार यांनी आम्हांला अदा केली होती., सदरील

रक्कम अदा केल्याच्या सर्व पावत्या मी तयार केल्या''. हे म्हणणे खरे नाही की, सदरील पावत्या मी खोटया दिल्या आणि साक्ष खोटी दिली.

फेरतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/—

दिनांक :—०७/१२/२०१९

(एस्.डी.जगमलानी),
अध्यक्ष,
मोटार अपघात वाद न्यायाधीकरण,
सिंधुदुर्ग—ओरोस.